# एम. बी. ए.- करियरची सोनेरी संधी

**(भाग-३)**

विद्यार्थ्यानी हे लक्षात घेतले पाहिजे की व्यक्तिमत्व विकासाकरिता काही कौशल्ये जाणीवपूर्वक आत्मसात करावी लागतात. जसे की चौफेर वाचनाची सवय. विविध विषयांच्या संदर्भग्रंथांचे, वर्तमानपत्रांचे, नियतकालिकाचे, संशोधन ग्रंथांचे वाचन करणे हे सर्वात उत्तम ठरते. माहिती तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून वेगवेगळ्या विषयांसंबंधी चांगल्या लेखांचे व लेखकांचे वाचन करून स्वत:ची आकलनक्षमता व ज्ञान वाढवणे हे सुदधा करणे गरजेचे ठरते. या बरोबरच प्रवेश घेण्याच्या पहिल्या दिवसापासूनच संभाषण कौशल्य व सादरीकरणाची कला याकडे लक्ष देवून आत्मसात केली पाहिजे. कारण असे आढळून येते की एखाद्या विद्यार्थी-विद्यार्थिनीला विषयाचे उत्तम ज्ञान आहे, परंतु, ते संभाषण कौशल्य व सादरीकरणात कमी पडतात आणि त्यामुळे मुलाखतीमध्ये मागे पडतात.

त्यासाठी संभाषणाचा व सादरीकरणाचा नियमित व जास्तीतजास्त सराव करणे हा एक चांगला मार्ग ठरू शकतो. नियमित सराव व जास्तीतजास्त वाचन या बळावर या दोन्ही वर प्रावीण्य मिळवता येते.जर विद्यार्थ्यांना करियरच्या वाटचालीबद्दल अनिश्चितता असल्यास त्यांनी एखाद्या तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे. अनुभव असा सांगतो की विद्यार्थ्यांनी सतत वाचन केले पाहिजे. व्यवस्थापनाचा सिद्धांत असे सांगतो की एखादे ध्येय गाठण्याकरिता आपण नेहमी उत्पादनक्षमपणे व्यस्त राहिले पाहिजे.बदलत्या परिस्थितीचा आढावा घेतल्यामुळे एखादा चांगला मार्ग उपलब्ध होवू शकतो. आज सागळीकडे मल्टीटास्किंगची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांनी वेळ-व्यवस्थापन कौशल्याकडे अतिशय बारकाईने लक्ष दिले पाहिजे. या सर्व बाबी यशस्वी जीवनाकरिता आणि सर्वोत्तम करियर करण्याकरिता आवश्यक आहेत. म्हणूनच विद्यार्थ्यांनी फक्त पदवीपर्यंत सीमित न राहता पदव्युत्तर शिक्षणाकडे जाणे त्यांच्या यशस्वी जीवनासाठी अनुकूल ठरू शकते.

वरील ठिकाणी चर्चा केलेप्रमाणे एमबीएची दोन वर्ष नियोजनबद्ध पद्धतीने विचारपूर्वक रचण्यात आली आहेत. संपूर्ण कोर्स हा सेमिस्टर पॅटर्न वर आधारित असून विद्यार्थ्यांना एकून ४ सेमिस्टर पूर्ण करावी लागतात. पहिलीदोन सेमिस्टर ही सर्वांसाठी सारखीच असतात. म्हणजेच या दोन सेमिस्टर मधील विषय सर्व विद्यार्थ्यांना सारखेच असतात. पहिल्या सेमिस्टर मध्ये व्यवस्थापनामधील पायाभूत विषय सर्वांना शिकवले जातात. दुसर्‍या सेमिस्टर मध्ये वेगवेगळ्या वैकल्पिक विषयाची ओळख करून दिली जाते जेणेकरून जे वैकल्पिक विषय विद्यार्थी नंतर निवडणार आहेत त्यांची पायाभूत ओळख व्हावी व द्वितीय वर्षामध्ये वैकल्पिक विषय निवडणे सोपे जावे.

या 21व्या शतकामध्ये व्यवस्थापन क्षेत्राकडे व्यापक दृष्टीने पहिले जाते. सतत ज्ञान मिळवत राहणे आणि व्यक्तिमत्वाचा विकास होत राहणे हाच शिक्षणाचा हेतु मानला जातो. आजच्या ह्या स्पर्धात्मक युगात विकासाला व्यावसायिकतेची जोड मिळाली तरच ह्या स्पर्धेच्या युगात टिकाव लागने शक्य आहे. हाच व्यावसायिक दृष्टिकोण देण्याचा महत्वाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच एमबीएची रचना करण्यात आली आहे. येथे विद्यार्थ्यांनी व पालकांनी हे समजून घेतले पाहिजे की केवळ अभ्यासक्रमाची पदवी संपादन केली म्हणून चांगले करिअर होते असे नाही तर अभ्यासक्रम योग्य प्रकारे पूर्ण करून आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

एमबीएला प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी अनेक घटकांचे स्वयमूल्यांकन करणे गरजेचे ठरते. एमबीए पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मुलाखत, कॉन्फरन्स आणि मॉक इंटरव्ह्यूला उपस्थित राहणे आवश्यक असते. याकरिता संभाषण कौशल्य अप्रतिम असले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मध्ये आत्मविश्वास आणि सकारात्मकता असली पाहिजे. एमबीएमध्ये प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनात आणि विचार करण्याच्या पद्धतीत बदल होऊ लागतो. विद्यार्थ्यांना टीमवर्क आणि सहकार्याचे मूल्य समजते. आज करिअरमध्ये यशस्वी व्हायचे असेल तर कॉर्पोरेट जगतामधील अत्यंत महत्वाचे असे सॉफ्ट-स्किल्स आणि विविध कौशल्ये यांना करियरच्या जगामध्ये विशेष असे स्थान आहे.विद्यार्थी पदवीनंतर एमबीए करण्यास प्राधान्य देतात कारण ‘प्लेसमेंट पॅकेज’ आणि ‘मिळणार्‍या पगाराची आर्थिक बाजू’ ही कारणेसुद्धा महत्वाची आहेत.

नवीन पदवीधरांच्या तुलनेत व्यवस्थापन पदवीधरास अनेक क्षेत्रामध्ये प्रारंभिक पगाराच्या तुलनेत जवळ- जवळ दुप्पट पगार मिळू शकतो. तसेच प्लेसमेंट पॅकेज सुद्धा इतर पदवीच्या तुलनेने एमबीए पूर्ण केल्यानंतर मिळणारे ऑफर केलेले पॅकेज जास्त असते.एमबीए पदवीमध्ये प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये आमुलाग्र बदल होवून व्यक्तिमत्वाचा विकास होवू शकतो आणि आत्मविश्वासाची पेरणी होवून व्यक्तिमत्व सुधारू शकते आणि विद्यार्थी यशाच्या मार्गावर पुढे जाण्यास प्रोत्साहित होवू शकतात. आत्मविश्वासामुळे एक आभा निर्माण होते जी यशाला आकर्षित करते. आत्मविश्वासामुळे आत्मसन्मान आणि आत्मसंयम निर्माण होतो. ज्यांच्याकडे उच्च पातळीचा आत्मविश्वास असतो त्यांच्या ऊर्जेचे अनुकरण केले जात आणि इथेच नेतृत्वाचा उगम होतो. (क्रमश:)


**डॉ. ताहीर स. झारी**

प्र.संचालक,डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, (एम.बी.ए.), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर)